'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी' यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

जून २०२५



# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी
## महत्त्वाच्या क्षणांची चित्रमय झलक



सहकार संस्था जिल्हा उपनिबंधक डॉ. शिंदे यांचा सहकारी पतसंस्था कार्यशाळेत स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेतर्फे सत्कार करताना पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन



ना. देवेंद्र फडणवीस यांनी संस्थेच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली तो क्षण. सोबत प्रवीण दरेकर



तत्कालीन सहकार मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते स्वरूपानंद पतसंस्थेला प्राप्त प्रतिबिंब पुरस्कार स्वीकारताना




एनसीडीसीच्या संचालकांच्या हस्ते उत्कृष्ट संस्था पुरस्कार प्राप्त करताना



पतसंस्थेच्या पावस शाखेच्या स्वतःच्या वास्तूचे उद्‌घाटन




राज्य फेडरेशनच्या संचालक सभेमध्ये कार्याध्यक्ष म्हणून सहभागी झालेले पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन

## संपादकीय

# जनसंचयातून धनसंचय करणाऱ्या विश्वासार्ह संस्थेचे मुखपत्र

आर्थिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थेला सातत्य ठेवून काम करावे लागते. जनसंचय करत धनसंचय करावा लागतो. हे करत असताना विश्वासार्हता जपावी लागते. आर्थिक शिस्तीला अनन्यसाधारण महत्त्व द्यावे लागते. जोडीला सातत्यही महत्त्वाचे ठरते. या सर्व गोष्टी नीटपणे जमल्या, तर रत्नागिरीच्या स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेसारखी प्रतिमा निर्माण होते. एक विश्वासार्ह पतसंस्था म्हणून स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने आपले नाव जनमानसात रूढ केले आहे.

स्वरूपानंद पतसंस्थेने ३४ वर्षांच्या प्रवासात अनेक महत्त्वपूर्ण टप्पे गाठताना नवीन टप्प्याचा वेध घेत आपले अर्थविश्व विस्तारले. केवळ कोट्यवधींच्या व्यवहारांवरच न थांबता स्वरूपानंद पतसंस्थेने ४८ हजार ग्राहक सभासदांना संस्थेच्या अर्थकारणात भागधारक केले. इतक्या मोठ्या संख्येने ग्राहक सभासद संलग्न झाल्याने संस्थेचा आर्थिक पाया विस्तारित झाला. सहकार चळवळीला अपेक्षित असलेल्या लोकसहभागातून अर्थकारण हा उद्देश संस्थेने सहज साध्य केला.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने गेल्या ३४ वर्षांमध्ये केवळ आर्थिक आकडेवारी वाढवली नाही, तर आर्थिक संस्थेला अपेक्षित असलेली प्रमाणबद्धता सातत्याने राखली. ही प्रमाणबद्धता संस्थेची आर्थिक ताकद अधोरेखित करती झाली. केवळ १० हजारांच्या भांडवलावर सुरू झालेले हे अर्थचक्र आज ६०० कोटींच्या संमिश्र व्यवसायापर्यंत पोहोचले आहे. तालुका कार्यक्षेत्रापासून केलेली सुरुवात आता राज्य कार्यक्षेत्रापर्यंत पोहोचली आहे. १७ शाखांच्या माध्यमातून आर्थिक सेवा देण्याचे कौशल्य व्यवस्थापनाने प्राप्त केले.

स्थापनेपासूनच संस्थेने सातत्याने लेखापरीक्षणात 'अ' श्रेणी सोडली नाही. उपलब्ध निधी योग्य पद्धतीने वक्तशीरपणे विनियोगात आल्याने संस्थेला योग्य परतावा प्राप्त होण्यात अडचण आली नाही आणि संस्थेचा नफा सातत्याने वाढता राहिला. वाढीव नफ्याचा विनियोग संस्थेने मालमत्तानिर्मितीकरिता निधी उभारण्यासाठी केला. तसेच, नफ्यातील मोठा भाग परत व्यवसायामध्ये वापरण्याचे कौशल्य पतसंस्थेने सुरुवातीपासून दाखवले. त्यामुळे स्वभांडवलावर मोठा नफा संस्थेला कमावता आला. आर्थिक संस्थेची ताकद ही स्वनिधी दर्शवत असतो. स्वनिधी वाढवण्याकडे पतसंस्थेने जाणीवपूर्वक लक्ष दिले. त्यामुळे आजच्या घडीला ४८ कोटी १३ लाख रुपयांचा स्वनिधी संस्थेने उभा केला आहे. कोणत्याही आर्थिक संस्थेला आदर्श ठरावी अशी अभिमान वाटण्यासारखी आर्थिक स्थिती संस्थेने प्रारंभापासून राखली आहे. २०१२ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात संस्थेला राज्य शासनाने 'सहकारभूषण' पुरस्काराने गौरवले. रत्नागिरीसारख्या सहकार क्षेत्रात फार नाव नसलेल्या जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील कामाला हा पुरस्कार प्राप्त होणे, ही फार लाखमोलाची बाब आहे. या पुरस्कारातून प्रेरणा घेऊन आणखी उंच शिखर गाठण्यासाठी संस्था मार्गस्थ झाली आहे. आर्थिक शिस्त आणि वस्तुस्थितीदर्शक माहिती संकलित करून, तसेच भविष्याचा वेध घेऊन घेतलेले निर्णय यामुळे आजपर्यंत संस्था अग्रस्थानी राहिली. हे अग्रस्थान अबाधित ठेवण्यासाठी सतत जागरूक राहणे महत्त्वाचे आहे, याचे भान आम्ही ठेवले आहे.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा हा प्रवास ग्राहक सभासदांपर्यंत योग्य पद्धतीने मांडण्याची, किंबहुना तो सातत्याने त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची गरज जाणवू लागली. म्हणून 'स्वरूप सहकार' हे मासिक सुरू करण्याचा निर्णय घेतला. 'स्वरूप सहकार' हे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे एक प्रकारे मुखपत्र असणार आहे. संस्थेची उद्दिष्टे, संस्थेचे उपक्रम, संस्थेचे महत्त्वाचे निर्णय, शासनाची परिपत्रके, संस्थेचा आर्थिक गोषवारा, संस्थेच्या आर्थिक स्थितीबद्दल सहकारतज्ज्ञांची मते या बाबी ग्राहक सभासदांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'स्वरूप सहकार'चे प्रयोजन करत आहोत. आपली संस्था आणि व्यापक स्तरावर असलेला ग्राहकवर्ग यांना जोडणारा दुवा म्हणून 'स्वरूप सहकार' काम करील.

स्वरूपानंद पतसंस्थेच्या प्रत्येक योजनेला ग्राहक सभासदांचा भरभरून प्रतिसाद मिळतो. तद्वत 'स्वरूप सहकार' या मासिकाला आपण स्वीकृती द्याल, हा विश्वास आहे. राष्ट्रवादाचा संदेश, सोबत ठेववृद्धी मासाची योजना असे पॅकेज घेऊन स्वरूप सहकार मासिकाचा पहिला अंक आपल्याकडे येतोय. आपण त्याचे नक्की स्वागत कराल, अशी खात्री वाटते.



**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
संपादक, स्वरूप सहकार
(अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था)

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक स्वरूपानंद प्रिंटिंग सर्व्हिसेस, लांजा येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२ येथे प्रसिद्ध केले.

**जून २०२५. पाने १६. संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर.

**मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मुखपृष्ठ :** प्रहर महाकाळ. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स.

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२. संपर्क : (०२३५२) २२१२६३/२९५३६३.

**वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com.

**This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Swaroopanand Printing Services, Lanja and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri-415612. Editor: Adv. Deepak Manohar Patwardhan. Executive Editor: Aniket Konkar. June 2025.**

# ... आणि ठेववृद्धी मासाचा महोत्सव घडत गेला!

स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आणि गुंतवणूकदार यांचा परस्परांवरचा विश्वास आणि स्नेहाचा आविष्कार घडवणारा ठेवोत्सव म्हणजे ठेववृद्धी मास. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने गेली ३४ वर्षे सहकार चळवळीत कमालीचे सातत्य ठेवून उत्तम काम करण्याचा प्रयत्न केला. अर्थकारणात शिस्त आणि प्रमाणबद्धता आवश्यक असते. हे इंगित ओळखून संस्थेने विश्वासार्हता, शिस्त आणि प्रमाणबद्धता राखत वाटचाल केली. अनेक प्रगतिशील संकल्पना राबवल्या. आपल्या प्रशासन व्यवस्थेवर कार्यक्षम व्यवहार आणि आचरणाचे संस्कार केले. त्यातून स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थविश्व उमलत गेले. विविध उपक्रम आणि विविध प्रयोगशील योजनांमधील एक अत्यंत लोकप्रिय ठरलेली आणि संस्थेलाही फलदायी ठरलेली योजना म्हणजे ठेववृद्धी मास. प्रतिवर्षी २० जून ते २० जुलै हा स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा ठेववृद्धी मास असतो.

## अशी पुढे आली ठेववृद्धी मासाची संकल्पना

प्रारंभी कर्जवितरणासाठी पैसा नव्हता. म्हणून मित्रपरिवारात फिरून काही रक्कम गोळा केली. खरे तर या प्रयत्नांतूनच ही ठेववृद्धी मासाची संकल्पना पुढे आली. पहिल्या घोषित ठेववृद्धी मासात तीन लाख रुपये जमले आणि गेली ३० वर्षे हा ठेववृद्धीचा महोत्सव प्रतिवर्षी अत्यंत उत्साहात, प्रचंड प्रतिसादात नवनवीन गुंतवणूकदारांना जोडत सुरू आहे. सुरुवातीला रत्नागिरी तालुका कार्यक्षेत्र असणारी संस्था असल्याने येथील अर्थकारण लक्षात घेऊन हा ठेववृद्धी मास जून-जुलै महिन्यात घेण्याचे आम्ही ठरवले. 'मनात आले आणि घोषित केले,' असा हा मास नाही. रत्नागिरीतील अर्थकारण आंबा पिकावर विसंबून असण्याचा तो कालखंड होता. २० जून ते जुलै या कालावधीत आंबा व्यावसायिकांचे हिशेब पूर्ण होत आणि तो पैसा हातात आलेला असे. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात शेतीची कामे उरकलेली असतात. शेतकरी, बागायतदार थोडे निवांत असतात. म्हणून ठेववृद्धी मासासाठी हा कालखंड निवडला. स्वामींच्या कृपेने ठेववृद्धी मास प्रचंड यशस्वी ठरत गेला.




## व्रतस्थ भूमिकेतून राबवलेल्या अभियानाचे दृश्य परिणाम


३० वर्षांपूर्वी संस्थेचे काम अगदी बाल्यावस्थेत होते. संस्थेची ओळख नव्हती; मात्र सातत्याने संस्थेचा विषय घेऊन समाजात जाणे, आप्त-स्वकीय, स्नेही यांना संस्थेची माहिती देऊन त्यांना ठेव ठेवण्याची गळ घालून, त्यांना त्यासाठी तयार करून, त्यांना घेऊन त्यांच्या मित्रपरिवारात ठेवी गोळा करण्यासाठी जाणे असा परिपाठ सुरू केला. गावागावात जाऊन संस्थेची माहिती देऊन, संस्थेची योजना समजावून सांगून, एक हजार ते पाच हजार, क्वचित प्रसंगी १० ते २५ हजार रुपयांच्या ठेवी गोळा करत दिवस दिवस फिरायचो. संध्याकाळी हिशेब केल्यावर जमा झालेल्या ठेवी पाहून अनेक वेळा हरखून जायला होई, तर अनेकदा निराशाही पदरी पडे; पण व्रतस्थ भूमिकेतून हे अभियान राबवले आणि त्याचे दृश्य परिणाम दिसू लागले. अनेक गावे, अनेक घराणी संस्थेशी कायमची जोडली गेली. ठेववृद्धी मासात लाखांचे आकडे मागे पडून कोटींच्या ठेवी जमू लागल्या. १० कोटी रुपयांचा पल्ला पार होऊन २० कोटींच्या नजीक ठेवी जमू लागल्या. ठेववृद्धी मासाची लोक वाट पाहू लागले. पैसे हाती आले, तर मे महिन्यापासूनच ठेवीदार स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेतील बचत खात्यात पैसे जमा करू लागले. लोकप्रियता वाढत गेली आणि ठेववृद्धी मासाला महोत्सवाचे स्वरूप आले.

## ठेववृद्धी मासाच्या यशाचे रहस्य

मोठ्या कल्पकतेने सुरू केलेल्या या ठेववृद्धी मासाच्या यशाचे रहस्य कशात आहे, याचा आढावा घेतला, तर सहज लक्षात येते, की या ठेववृद्धी मासात जनसंपर्कातून ठेवीदारांना संस्थेबाबतची माहिती देऊन त्यांना ठेव ठेवण्यासाठी उद्युक्त केले जाते आणि संस्थेच्या प्रगतीचा आलेख संभाव्य ठेवीदारांसमोर मांडला जातो. त्यातून एकेक ठेवीदार, मग त्याचे कुटुंब, मग स्नेही असे संस्थेचे ठेवीदार होत गेले. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची आर्थिक स्थिती अभ्यासली, तर सहज नजरेत भरते, ते ९९ टक्क्यांपेक्षा अधिक असलेले कर्जवसुलीचे सातत्यपूर्ण प्रमाण. तसेच संस्थेचा वाढता निव्वळ नफा, संस्थेची सातत्याने प्रमाणबद्ध पद्धतीने वाढणारी बँक गुंतवणूक, संस्थेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण २८ टक्के इतके विक्रमी असणे या गोष्टी महत्त्वपूर्ण आहेत. या सर्वांबरोबरच संस्थेचा स्वच्छ, पारदर्शक तोंडवळा हीदेखील महत्त्वाची बाब आहे. संस्था न चुकता दरवर्षी ३१ मार्च रोजी म्हणजे आर्थिक वर्षाच्या अखेरच्या दिवशीच आपली आर्थिक स्थिती जाहीर करते. या सर्वांबरोबरच माध्यमांचा उचित उपयोग करून वेळोवेळी आर्थिक स्थितीबाबत दिलेली माहिती, राबवलेले बहुविध उपक्रम, त्यामुळे ग्राहक आणि संस्था यांच्यामध्ये निर्माण झालेले सौहार्दाचे वातावरण या सर्वांतून ठेवीदारांना संस्थेबाबतचा विश्वास प्राप्त झाला.

## अवास्तव व्याजदरांचे आमिष नाही

याच जोडीला संस्था ठेववृद्धी मासात ठेवींवरचे व्याजदर थोडे वाढवते; मात्र ठेवीच्या व्याजदरांचे आकर्षण वाढवून ठेवीदारांना आकृष्ट करण्याचे धोरण संस्थेने कधीच अंगीकारले नाही. आर्थिक स्थिती, आपली गरज, कर्जवितरणाचा वेग, निश्चित केलेली आपली उद्दिष्टे यांचा साकल्याने अभ्यास करून संस्था आपले व्याजदर सहकार खात्याच्या धोरणांना अनुसरून ठरवत आली आहे. अतिरिक्त व्याजदर देणे म्हणजे धोका वाढवणे. त्यापेक्षा संयत व्याजदर देऊन सुरक्षितता मात्र वाढवत नेऊन ठेवी संरक्षित ठेवाव्यात आणि ठरलेला व्याजपरतावा वेळीच देता यावा, असे धोरण संस्थेने स्वीकारले. ठेवीदारांनीही या धोरणाचे स्वागत केले आणि संस्थेच्या ठेव योजनांना प्रतिसाद दिला. म्हणजेच धोकादायक अतिरिक्त व्याज देऊन ठेवी आकृष्ट न करता आर्थिक गणिते मांडून नेमके नियोजन करून संस्था सातत्याने त्यानुरूप ठेवींचे व्याजदर देते. त्यामुळे ठेवी सुरक्षित राहतात, हा विश्वास ठेवीदारांना वाटतो. म्हणून ठेवीदार स्वामी स्वरूपानंद संस्थेच्या ठेव योजनांशी संलग्न होतो.




## भक्कम आर्थिक स्थिती

स्वरूपानंद संस्थेकडे सद्यःस्थितीत २२ हजार ठेवखात्यांच्या माध्यमातून ३४९ कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. त्यापैकी १५२ कोटी रुपये संस्थेने विविध बँकांमध्ये गुंतवले आहेत. ३४ वर्षांच्या मंथनातून संस्थेने ४७ कोटी रुपयांचा भरभक्कम स्वनिधी निर्माण केला आहे. २६३ कोटी रुपयांची कर्जे संस्थेने वितरित केली आहेत. त्यांची वसुली ९९.७२ टक्के असून, संस्थेचा एनपीए गेली १५ वर्षे शून्य टक्के आहे. संस्थेचा लेखापरीक्षण वर्ग सातत्याने `अ' राहिला असून, अशा उत्तम स्थितीमुळे संस्थेला महाराष्ट्र शासनाचा सहकारभूषण पुरस्कार, राष्ट्रीय सहकार निगमचा उत्कृष्ट संस्था पुरस्कार, राज्य फेडरेशनचा दीपस्तंभ पुरस्कार, `बँको'चा बँको ब्लू रिबन असे अनेकविध पुरस्कार वेळोवेळी मिळाले आहेत.

## यंदाचा ठेववृद्धी मास राष्ट्रप्रेमाला समर्पित

यावर्षीही २० जून ते २० जुलै या ठेववृद्धी मासात तीन योजना घेऊन संस्था ठेवींसाठी साद घालत आहे. या योजनांमध्ये अधिकाधिक ठेव गुंतवून ठेवीदारांनी आकर्षक व्याजपरताव्याचा लाभ घ्यावा, असे विनम्र आवाहन करत आहे. या वर्षीच्या ठेववृद्धी मासाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो राष्ट्रप्रेमाला समर्पित असणार आहे. राष्ट्रप्रेमाची प्रखर भावना प्रत्येक भारतीयाच्या मनात आहे. सहकारी चळवळसुद्धा राष्ट्रीय भावनेचा सन्मान करते. भारताची संरक्षण दले आणि त्यांनी बजावलेल्या देदीप्यमान कामगिरीपुढे नतमस्तक होतानाच आपल्या अर्थकारणातून ठरावीक निधी या संरक्षण खर्चासाठी योगदान म्हणून देणे, ही स्वरूपानंद पतसंस्थेसाठी गौरवांकित होण्यासारखी बाब आहे. ठेववृद्धी मासात जेवढे ठेवीदार नव्याने ठेव गुंतवतील, त्या प्रत्येक ठेवीदारामागे २५० रुपये बाजूला ठेवले जातील. ठेववृद्धी मास संपल्यानंतर संस्थेच्या सोशल वेल्फेअर निधीतून २१ जुलै २०२५ रोजी त्या एकत्रित रकमेचा धनादेश शासकीय यंत्रणेमार्फत संरक्षण मंत्रालयाकडे सुपूर्द केला जाईल. सहकार चळवळीत फार मोठी ताकद सामावलेली आहे. सहकार चळवळीमधून भांडवल निर्मितीही मोठ्या प्रमाणावर करता येते, हे स्वरूपानंद पतसंस्थेने आपल्या उदाहरणातून सिद्ध केले आहे. सहकारातील ही ऊर्जा राष्ट्रासाठी सकारात्मक मार्गाने वापरण्याचे हे छोटेसे योगदान ठरेल; पण हा संस्कार महत्त्वाचा आहे. आजपर्यंत जे ठेवीदार संस्थेकडे विश्वासाने ठेव गुंतवत आले आहेत त्या आणि नव्याने गुंतवणूक करणार आहेत अशा सर्वांना पतसंस्थेच्या माध्यमातून या राष्ट्रीय कार्यात सहभागी होता येणार आहे. त्यामुळे अधिकाधिक ठेवीदारांनी या ठेववृद्धी मासात स्वरूपानंदमध्ये गुंतवणूक करावी.

संस्थेचे संचालक, अधिकारी, कर्मचारी, रोजठेव प्रतिनिधी आपल्याशी संपर्क साधतील. आपणही संस्थेच्या १७ ठिकाणी असलेल्या शाखांशी संपर्क साधून ठेव योजनांची माहिती घेऊन आपली अनमोल ठेव संस्थेत गुंतवावी. संस्थेला आता ५०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा खुणावत आहे. चालू आर्थिक वर्षात ४०० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पूर्ण करून २०२६-२७ या आर्थिक वर्षात ५०० कोटींचा टप्पा पार करण्याचा संकल्प मनोमन केला आहे. आपल्या सर्वांचे सहकार्य, स्नेह आणि विश्वास या ऊर्जेवर, तसेच स्वामींच्या आशीर्वादाने स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची यशस्वी अर्थगाथा अधिक द्रुतगतीने अग्रेसर होईल, असा विश्वास वाटतो.

**- ॲड. दीपक म. पटवर्धन**

**अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था**

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची सुरुवातीची स्थिती

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित, रत्नागिरी ता

[ रजि. क्र. आरटीजी/[आरटीजी]/आर. एस. आर. ७०५/९०-९

सन १९९१ तारीख ४-२-९१.

संस्थेच्या स्थापनेपासून ३०-६-१९९१ अखेर

पत्रक नं. १ – तेरीज पत्रक

| जमा | | खर्च | |
|---|---|---|---|
| १, २९०-०० | प्रवेश फी | १, २९०-०० | प्रवेश फी |
| १९, १००-०० | भाग भांडवल खाते | १७, ९३८-१० | सेव्हिंग बँक खाते. |
| २१८-१० | सेव्हिंग खात्यावरील व्याज | ६, ०००-०० | सभासद कर्ज खाते |
| ५४-०० | कर्जावरील व्याज | १, ४१५-५० | किरकोळ खर्च खाते |
| ६, ४५०-०० | सेव्हिंग बँक खाते | ५८१-८० | टपाल हशील खाते |
| ४००-०० | कर्ज खाते | ५०-०० | शेअर खरेदी |
| १, २९०-०० | गंगाजळी | ५००-०० | मेहनताना खाते |
| | | ८५५-०० | मुद्रण वलेखन सामुग्री खा |
| | | १७१-७० | रोख शिल्लक |
| २८, ८०२-१० | एकूण | २८, ८०२-१० | एकूण |

पत्रक नं. २ – जिंदगी पत्रक

| कर्ज [ देणे ] | | जिंदगी [ येणे ] | |
|---|---|---|---|
| १, २९०-०० | प्रवेश फी [गंगाजळी] | ५०-०० | शेअर [र. जि. म. स. बँक] |
| १९, १००-०० | भाग भांडवल | ५, ६००-०० | सभासद कर्ज |
| २०, ३९०-०० | | ११, ४८८-१० | सेव्हिंग बँक खाते |
| – ३, ०८०-२० | तोटा | १७१-७० | रोख शिल्लक |
| १७, ३०९-[illegible]० | | १७, ३०९-८० | |

पत्रक नं. ३ – नफातोटा पत्रक

| जमा [ उत्पन्न ] | | खर्च [ नावे ] | |
|---|---|---|---|
| २१८-१० | सेव्हिंग खात्यावरील व्याज | १, ४१५-५० | किरकोळ खर्च |
| ५४-०० | कर्जावरील व्याज | ५८१-८० | टपाल हशील खाते |
| २७२-१० | | ५००-०० | मेहनताना खाते |
| ३, ०८०-२० | तोटा | ८५५-०० | मुद्रण व लेखन सामुग्री खाते |
| ३, ३[illegible]-३० | एकूण | ३, [illegible]० | |

दिपक म. पटवर्धन

# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची आजची स्थिती

## स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी

**एकत्रित ताळेबंद ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५**

| सन २०२३-२४ | भांडवल व देणी | | सन २०२४-२५ | सन २०२३-२४ | जिंदगी व येणी | | सन २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | | ६ |
| २०००००००.०० | **अधिकृत भागभांडवल** | | २०००००००.०० | | **हाती व बॅंक शिल्लक** | | |
| १७७०२२५०.०० | भागभांडवल | | २०७०४५५०.०० | २०८७४६७६.०० | हाती शिल्लक | २२१४९३१२.०० | |
| | निधी | | | ११६३३४.०० | जनता सहकारी बॅंक करंट | २२३०५३.९२ | |
| २६५०००००.०० | मालमत्ता निर्मिती निधी | ५१५००००० | | ०.०० | बंक ऑफ महाराष्ट्र करंट | १३०८०३.२४ | |
| १३४५८५३७२.५० | गंगाजळी | १५२७४२६७७.५० | | ८३०९३.९२ | जनता सहकारी बॅंक बचत | ६९१०५.३८ | |
| २५००००००.०० | जनरल फ्री रिझर्व्ह | २५००००००.०० | | २९०४१.१९ | र.जि.म.स.बॅंक बचत | ३३९२१.१९ | |
| ३०६९६४.०० | सिल्व्हर ज्युबिली फंड | **३०६९६४.००** | | ३३६०७१.८० | बॅंक ऑफ इंडिया बचत | १३९४३८४.४२ | |
| १६८२६०२.१२ | संस्था विकास व प्रसार निधी | १८२७१८९.१६ | | १४१२२९.१० | र.जि.म.स.बॅंक करंट | ५५७४१०.१० | |
| ४८७९५४०.०६ | सामाजिक कल्याण निधी | ४२६१५४०.०६ | | ५५८३.०० | शामराव विठ्ठल को-ऑप बॅंक करंट | ५१९३.०० | |
| २१६५१७९.०० | प्रशिक्षण कार्यक्रम व प्रगती निधी | २१५११३७.०० | | ११५५०११७.४६ | आयसीआयसीआय बॅंक करंट | ४८३९३७५.५९ | |
| ३५०००००.०० | प्लेज्ड गोल्ड व्हॅल्यू चढउतारनिधी | ३५०००००.०० | | ११९९२.४५ | सारस्वत बॅंक करंट | ६२१९.३७ | |
| २१६९५२६.५० | नवीन शाखा स्थिरता निधी | २१६९५२६.५० | | ३६४५६९९.५० | सिंधुदुर्ग जि.म.स.बॅंक करंट | ४५७२०.५० | |
| २५८०७२६.०० | न्यू टेक्नॉलॉजी फंड | २५८०७२६.०० | | ०.०० | NKGSB बॅंक करंट | ०.०० | |
| २९९४२५.०० | निवडणूक फंड | २९९४२५.०० | | १२२८६.८० | यूनिटी स्मॉल फायनान्स बॅंक करंट | १५९२५.७० | |
| ५००००००.०० | व्याजदरचढउतारनिधी | ५००००००.०० | | **३६८०६१२५.२२** | | | **२९४७०४२४.४१** |
| ४५३००००.०० | सभासद व कर्मचारी कल्याण निधी | ४५३००००.०० | | | गुंतवणूक | | |
| ४९८८७३७.०० | ग्राहक सभासद कोव्हीड १९ सहायता नि | ४९५५१५५.०० | | १२४४६७१४३.८६ | इतर सहकारी बॅंक गुंतवणूक | १०३०४५२५.०० | |
| २१००३५११३५.७५ | बिल्डींग फंड | २२००३५११३५.७५ | | १९५८९९१७३२.०० | र.जि.म.स.बॅंक गुंतवणूक | १०९३६८१२९१.०० | |
| ६५००००००.०० | गुंतवणूक जोखीम व्यवस्थापन निधी | ६५००००००.०० | | ८६३३३७८१.०३ | राष्ट्रीय बॅंक गुंतवणूक | ०.०० | |
| **४३४७२३२०७.९३** | | | **४८७३५९४७५.९७** | १५२१४९०.०० | शेअर्स | १५७२४९०.०० | |
| | ठेवी | | | १३५५४१३०२.०० | र.जि.म.स.बंक रिझर्व्ह फंड | १५३२०७८६१.०० | |
| ७४५३७.०० | चालू ठेव | ७४५३७.०० | | ०.०० | NKGSB बॅंक मुदतठेव | २५३६२९०.०० | |
| २६२९२५७४५.७० | बचत ठेव | २८७२८६४८७.४९ | | ०.०० | SVC बॅंक मुदतठेव | २०३८७५००.०० | |
| १६४०७८७३.०० | आवर्ती ठेव | १८४२४५९४.०० | | ०.०० | सारस्वत बॅंक मुदतठेव | १२०९९३२१८.०० | |
| ३२३५९२५९.०० | धनसंचय आवर्त ठेव | ३०८७०३९०.०० | | ०.०० | ICICI बॅंक मुदत ठेव | ३१९८१०००.०० | |
| ११०८९१२९८.२० | पिग्मी ठेव | ११४६५०४०४.२० | | ०.०० | जनता बॅंक मुदत ठेव | ३७२२२९७.०० | |
| ९२३३८४६६२.०० | मासिक व्याज ठेव | १०८०७४२९७४.०० | | ०.०० | DNS बॅंक मुदतठेव | २०७२४४१३.०० | |
| १७१२२७२१०५.०० | अल्पमुदत ठेव | १९०१७३४७०२.०० | | ०.०० | राजापूर अर्बन बॅंक मुदतठेव | २७०२१९२.०० | |

# स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

## प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी

### एकत्रित ताळेबंद ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५

| सन २०२३-२४ | भांडवल व देणी | | सन २०२४-२५ | सन २०२३-२४ | जिंदगी व येणी | | सन २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | | ६ |
| २९४२६२५६.०० | पुनर्गुंतवणूक ठेव | २८०८२८३५.०० | | ०.०० | बँक ऑफ महाराष्ट्र मुदतठेव | ३०५६७९४०.०० | |
| २८८०५४.५० | मुदतपूर्ण ठेव | २५०८५९.५० | | ०.०० | दापोली अर्बन बँक मुदतठेव | १००००००.०० | |
| **३०८८०२९७१०.४०** | | | **३४६२११७७८३.१९** | **१५०६८५५४४८.८९** | | | **१४९३३८१०१७.००** |
| | तरतूद | | | | कर्ज | | |
| २३००९६०२.१० | बुडीत येणे निधी | २३००९६०२.१० | | १६९७३९७३९.०० | वैयक्तिक कर्ज | १६४०३९५४४.०० | |
| ०.०० | थकव्याज तरतूद | ०.०० | | ५०६२२८७७.०० | वाहन कर्ज | ६७४४११२९.०० | |
| १४१७६७२७.०० | ग्रॅच्युइटी तरतूद | १६७७६७२७.०० | | ४१४३५३६०४.०० | मालमत्ता कर्ज | ४३१६३०७७३.०० | |
| ११३८७४३.५० | ऑडिट फी तरतूद | १२५०५४९.५० | | २३१४८९९७.०० | कॅश क्रेडिट | २४५५३१३१.३६ | |
| १८६१८९१.०० | लाभांश देणे तरतूद | २०७३७९४.०० | | ९१२६४८९७.०० | पिग्मी/मुदतठेव/आवर्त तारण ठेव क | १०९५९३४८२.०० | |
| ५३५४३६.०० | सानुग्रह अनुदान तरतूद | १०६००६८.०० | | १४००७३०१५६.०० | सोनेतारण कर्ज | १७२५०३४५२१.०० | |
| ९३५६९२.०० | आकस्मिक खर्च तरतूद | ९३५६९२.०० | | १२२६००७.०० | सोनेतारण सीसी कर्ज | ४१८५४८१.०० | |
| ४५२९.०० | म्युनिसीपल टॅक्स तरतूद | ४५२९.०० | | **२१५१०८६२७७.००** | | | **२५२६४७८०६१.३६** |
| १४४००.०० | सोसायटी मेंटेनंस फी तरतूद | ०.०० | | | मालमत्ता | | |
| २८४५७०९.०० | प्रोव्हीजन फॉर आऊटस्टॅण्डींग एक्स्पेन्स | ३२५६६२९.०० | | ११९८७.०० | इमारत जूनी | १०७८९.०० | |
| ५३८५०००.०० | उत्तम जिंदगी तरतूद | ६३३५०००.०० | | ३१८४६४०२.८५ | इमारत नवीन | २८६५७८८१.८५ | |
| ४४९२६५.०० | व्हीआरएस प्रोव्हीजन | ०.०० | | १०१२४१८०.०२ | फर्निचर फिक्स्चर | ९९६०७११.०७ | |
| ९०६८१६१.०० | स्टॅट्युटरी फॉर्मलिटी कम्प्लीशन फंड | १७५६८१६१.०० | | ७२१९४८.५६ | कॉम्प्युटर | ६०६७०४.०१ | |
| १००००००.०० | दुरुस्ती देखभाल निधी | १००००००.०० | | ६१३३७९.०० | व्हेईकल | ४९०७०३.०० | |
| २५२२१९४.०० | क्लोजिंग अलाउन्स निधी | ३१७८६३०.०० | | १०९१३.०० | लायब्ररी | १०३७१.०० | |
| १००९४४०.०० | लॉस असेट तरतूद | १००९४४०.०० | | ६६८७४८०.६७ | डेडस्टॉक | ६६८२६४४.९७ | |
| १४१२२२.०० | स्टाफ इन्सेंटीव्ह फंड | ३१४१२२२.०० | | ९५२२.९२ | पिग्मी मशीन | ६१३४.९२ | |
| १००००००.०० | रीटायरमेंट बेंनिफीट तरतूद | १४४९२६५.०० | | ६१०३७५.३३ | आनलाईन इन्व्हर्टर | ७५४९३६.५५ | |
| **६५०९८०११.६०** | | | **८२०४९३०८.६०** | ४१४८३४.२६ | एअर कंडिशनर | ३३१८६६.२६ | |
| | इतर देणी | | | ४६६८५५.६२ | ऑफिस इक्वीप्मेंट | ६९३०९३.८३ | |
| ८००००.०० | ओ.बी.सी. | ०.०० | | ०.०० | बिल्डींग साठी जागा | ३४४८००००.०० | |
| ५२३७०.०० | ओ.डी व्याज देणे | ३१९७५.०० | | **५१५१७८७९.२३** | | | **८२६८५८३६.४६** |
| ६४२६०.६५ | कर्जअनामत | ६४२६०.६५ | | | इतर येणी | | |
| ३९२७७२.५० | अनामत | ३९५८०२.५० | | ०.०० | ॲडव्हान्स | ५२९२२८.०० | |

# स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

**प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी**

**एकत्रित ताळेबंद ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५**

| सन २०२३-२४ | भांडवल व देणी | | सन २०२४-२५ | सन २०२३-२४ | जिंदगी व येणी | | सन २०२४-२५ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | | ६ |
| ६६०.०० | निवडणूक अनामत | ०.०० | | १९९९३.०० | टेलिफोन डिपॉझिट | १४६९९.०० | |
| २२९२२८९.०० | देय व्याज | २४०८९४८.०० | | ४५२०५.०० | इलेक्ट्रिसिटी डिपॉझिट | ५४५०५.०० | |
| १०६१६०.०० | टी.डी.एस पेएबल | ३०८०.०० | | ८२७३५३६.०० | टी.डी.एस.रिसिव्हेबल | ८०८६९९७.०० | |
| ५४०६४.०० | आऊटपूट जीएसटी (लिलाव) | ३८०२६.०० | | १८८१३.७९ | डेफर्ड रिव्हेन्यु | १३४६८.०० | |
| २७४४८३४३.८१ | र.जि.म.स. बँक ओव्हरड्राफ्ट | ४९३०६८९.८१ | | ३४१५९२८.०० | प्रिपेड गोल्ड इंशुरन्स | ४६९५१२१.०० | |
| १६१२९३.७४ | जीएसटी देणे आऊटपूट | १७७७१४.४० | | ०.०० | गुंतवणूक व्याज येणे | ६६३२५.०० | |
| | आऊटपूट जीएसटी (RCM) | १४८८६.०० | | ४११०००.०० | सिक्युरिटी डिपॉझिट भाडे | ४६१०००.०० | |
| १३००००००.०० | आयसीआयसीआय बँक ओव्हरड्राफ्ट | ३००००००.०० | | ३३६४१८.०० | प्रिपेड कॅश इन ट्रान्झिट इंशुरन्स | ३३६४१८.०० | |
| ४०००००००.०० | गुंतवणूकीवरील कर्ज | ०.०० | | ८००००.०० | ओ.बी.आर. | ०.०० | |
| २२७८.६० | आरटीजीएस/एनईएफटी सस्पेन्स | २४५०.६० | | ३२२०५०.६६ | जीएसटी रिसीव्हेबल इनपूट | ४२००८७.६४ | |
| **८३६५४४९२.३०** | | | **११०६७८३२.९६** | ३६१२४६.०२ | प्रिपेड वेब सर्व्हीस खर्च | १६४२०२.०२ | |
| | | | | ६९५.०० | प्रिपेड फास्ट टॅग | ४२५.०० | |
| ७२४८७२७.०० | ओव्हरड्यू इंटरेस्ट रिझर्व्ह npa | ५१८६२४७.०० | | २४४४५.०० | प्रिपेड फायर इंन्शुरन्स | ०.०० | |
| **७२४८७२७.००** | | | **५१८६२४७.००** | **१३३०९३३०.४७** | | | **१४८४२४७५.६६** |
| | नफा | | | | एनपीए कर्जावरील येणे व्याज | | |
| ७०३०६३१३.८८ | सर्व शाखांचा एकत्रित नफा | ८३२६८५५५.५९ | | २०९४५५१.०० | कर्ज | ८२७५९७.०० | |
| ६०९९४.७० | मागील शिल्लक नफा | २९०३०८.५८ | | ५१५४१७६.०० | मालमत्ता कर्ज | ४३५८६५०.०० | |
| **७०३६७३०८.५८** | | | **८३५५८८६४.१७** | **७२४८७२७.००** | | | **५१८६२४७.००** |
| | | | | | | | |
| **३७६६८२३७८७.८१** | | | **४१५२०४४०६१.८९** | **३७६६८२३७८७.८१** | | | **४१५२०४४०६१.८९** |

# खडतर सुरुवातीपासून कोटीच्या कोटी उड्डाणांपर्यंत...

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आज ३५० कोटी रुपयांच्या ठेवी, २६३ कोटींची कर्जे, १५२ कोटींची गुंतवणूक, २८ टक्के भांडवलपर्याप्ततेचे प्रमाण, आठ कोटी ३२ लाख रुपयांचा निव्वळ नफा, ९९.७१ टक्के वसुली, शून्य एनपीए अशी आर्थिक संस्थेला भूषणावह ठरावी अशी आर्थिक स्थिती गाठून सातत्याने मार्गक्रमण करत आहे. ४८ हजार सभासदांचा एकजिनसी समूह संस्थेला ऊर्जा देत आहे. या ऊर्जेच्या बळावर भांडवल निर्मिती आणि त्याची व्यवस्था करून आपल्या साधनांचा सर्वोत्तम विनियोग करत संस्थेने उत्तम अर्थकारणाचा परिपाठ निश्चित केला आहे. प्रारंभीपासूनच सहकाराची खरी ताकद ओळखून स्वरूपानंद पतसंस्थेने कोणत्याही वित्तीय संस्थेवर विसंबून न राहता स्वावलंबनाचा मार्ग चोखाळला. आपली समाजातील पत, विश्वासार्हता याच्या जोरावर ठेव योजनांच्या माध्यमातून भरपूर भांडवल उभारणी करून प्रमाणबद्ध कर्जवितरण आणि कर्जवसुली हे चक्र सातत्याने गतिमान राखण्यात यश मिळवले आणि त्यातून संस्थेचे आजचे स्वरूप साकार झाले.




## सातत्यपूर्ण प्रयत्न, व्रतस्थ भूमिका

स्वरूपानंद पतसंस्थेला आजचे विराट स्वरूप अचानक प्राप्त झालेले नाही. ३४ वर्षांतील सातत्यपूर्ण प्रयत्न, प्रामाणिक, तत्त्वनिष्ठ पद्धतीने व्रतस्थ भूमिकेतून झालेले काम या सगळ्यातून सहकारी जगतातील स्वरूपानंद पतसंस्था साकार झाली. प्रारंभी अत्यंत खडतर प्रयत्नांतून संस्थेचे मार्गक्रमण झाले. इतका मोठा टप्पा संस्था गाठेल, अशी अपेक्षा कोणीच केली नव्हती. ३४ वर्षांपूर्वी सहकारी चळवळीकडे पाहण्याचा दृष्टिकोन फार सकारात्मक नव्हता. किंबहुना तो नकारात्मक होता. सहकार म्हणजे भ्रष्ट कारभार, तोटा, फसवाफसवी, भांडवल बुडवण्याची व्यवस्था असे सारे अवगुण घेऊन कोकणातील सहकार दिवस काढत होता. त्या मलीन प्रतिमेला पुसून स्वच्छ प्रतिमा निर्माण करण्याचे आव्हान स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेसमोर होते. संस्थेचे प्रारंभीचे स्वरूप केवळ ३०० सभासद आणि १० हजारांचे भांडवल एवढेच होते. पहिल्या १० वर्षांत संस्थेचा आवाका जेमतेम पाच कोटी रुपयांपर्यंत पोहोचला; मात्र त्यानंतर संस्थेने कात टाकली. सहकारात राहूनही व्यावसायिक दृष्टिकोन विकसित केला. उपक्रमशीलता राखली. नीट नियोजन केले आणि त्याप्रमाणे कार्यान्वयन केले की यश मिळते हे ओळखून संस्थेने कामाला सुरुवात केली आणि संस्थेचे अर्थकारण गतिमान होत गेले. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची स्वतःची प्रतिमा निर्माण होत गेली. आर्थिक क्षेत्रात विश्वासार्ह पतसंस्था म्हणून ही संस्था लक्ष वेधून घेऊ लागली. २०१३मध्ये पतसंस्थेने ५० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केला. त्यानंतरच्या १० वर्षांत आता संस्थेने ३५० कोटी रुपयांच्या ठेवींचा टप्पा पार केला आहे. वाढीची ही गती कोणत्याही आर्थिक संस्थेला अभिमानास्पद वाटेल अशीच आहे. तालुका कार्यक्षेत्रापासून प्रारंभ करत जिल्हा कार्यक्षेत्र, विभाग कार्यक्षेत्र आणि आता राज्य कार्यक्षेत्र असलेली संस्था म्हणून स्वामी स्वरूपानंद पतसंस्था कार्यरत आहे. १७ शाखांच्या माध्यमातून पतसंस्थेने खेडोपाडी, तसेच पुणे महानगरात आपल्या आर्थिक सेवा देत ग्राहकवर्ग जोडला आहे.

## ३५०० रुपयांच्या तोट्यापासून ८.३२ कोटींच्या नफ्यापर्यंत...

प्रारंभीच्या सात महिन्यांमध्ये संस्थेला ३ हजार ५०० रुपयांचा तोटा झाला होता; मात्र हा तोटा भरून काढत संस्थेने प्रथम १९९३ साली ५ हजार ९५१ रुपयांचा निव्वळ नफा प्राप्त केला. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या अखेरीला निव्वळ नफा आठ कोटी ३२ लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे. ही वाढ तब्बल १३ हजार ९८४ पट आहे. सहकारी चळवळीत नफेखोरी अपेक्षित नाही, याचा अर्थ नफा होताच कामा नये असा नाही. उपलब्ध पैशांचा सर्वोत्तम आणि कार्यक्षम पद्धतीने विनियोग करणे, पैसा पाडून न ठेवता त्याचा उचित परतावा प्राप्त होईल असा वक्तशीर विनियोग करणे, पैसा उभारणीचा खर्च मर्यादेत ठेवणे, निधी उभारणी दर आणि कर्जवितरण दर यात उचित समन्वय राखून कर्जवितरण करणे आणि वितरित केलेल्या कर्जाची नियमित वसुली करणे हे चक्र नियमित ठेवले आणि खर्चावर योग्य नियंत्रण ठेवून प्रमाणबद्धता पाळली, की नफा होतोच; त्यासाठी लुबाडणूक करावी लागत नाही, याचा प्रत्यय स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या अर्थकारणाने दिला. उत्तम नफा प्राप्त केल्याने कायदेशीर बाबींवर प्रमाणबद्ध तरतूद करून राहिलेल्या रकमेतून चांगला स्वनिधी निर्माण करणे शक्य होते, हे स्वरूपानंद पतसंस्थेने ४७ कोटींचा स्वनिधी तयार करून दाखवून दिले. स्वनिधी ही संस्थेची मजबूत आर्थिक ताकद दर्शवतो. ३४ वर्षांच्या अभिसरणातून कोणतेही बाहेरील दायित्व नसलेला जो निधी तयार झाला, तो खरे तर शून्य टक्के व्याजदराने संस्थेच्या वापरात येतो. त्यामुळे संस्थेचे अर्थकारण अधिक सुदृढ झालेले जाणवते. स्वामी स्वरूपानंद पतसंस्था आता कोट्यवधींचे व्यवहार करते; पण हे भांडवल भांडवलशहांनी दिलेले नाही, तर ४८ हजार सभासदांनी सहकार तत्त्वावर विश्वासून ही भांडवलनिर्मिती केली आहे. ४८ हजार सभासदांच्या व्यापक आर्थिक पायावर पतसंस्था विराजमान आहे.

## अनुत्पादक मालमत्ता नाहीतच...

पतसंस्थेचे ३४ वर्षांचे गुणवैशिष्ट्य सांगायचे झाले, तर लक्ष जाते संस्थेच्या सातत्यपूर्ण वसुलीकडे. वसुली हा आर्थिक संस्थेचा आत्मा आहे, हे वेळीच ओळखून वसुलीसाठी परखड, कर्तव्यकठोर धोरण संस्थेने प्रारंभापासून अवलंबले. त्याचा उचित लाभ झाला आणि विक्रमी वसुली करणारी संस्था म्हणून संपूर्ण महाराष्ट्राच्या पतसंस्था चळवळीमध्ये स्वरूपानंद पतसंस्थेची ओळख निर्माण झाली. एनपीए म्हणजे नॉन परफॉर्मिंग असेट्स (अनुत्पादक मालमत्ता) ही संकल्पना पतसंस्थांना २००९ साली लागू झाली. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने तेव्हापासून आतापर्यंत सातत्याने एनपीएचे प्रमाण शून्य टक्के राखण्यात यश प्राप्त केले. त्यामुळे विश्वासार्ह पतसंस्था म्हणून पतसंस्थेची ओळख निर्माण झाली.

## उत्तम ग्राहकसेवा

विश्वासार्हता, आर्थिक शिस्त याचप्रमाणे अनन्यसाधारण महत्त्व असलेला घटक म्हणजे ग्राहकसेवा. आपल्या ग्राहकांना सर्वोत्तम सेवा देणे, प्रामाणिक, वक्तशीर आणि अचूक सेवा देणे यातून ग्राहकाबरोबर अतूट नाते तयार होते. हे दृढ नाते प्रस्थापित करण्यात स्वरूपानंद पतसंस्था यशस्वी झाली. ग्राहक सेवा द्यायची असेल, तर आवश्यक असतो नेकीने काम करणारा कर्मचारी आणि अधिकारीवर्ग. सहकार तत्त्व, ग्राहकसेवा, आर्थिक शिस्त याचे बाळकडू घेऊन स्वरूपानंद पतसंस्थेचा कर्मचारीवर्ग व्रतस्थ वाटावी अशी भूमिका घेऊन ग्राहकसेवा देतो. त्यामुळे समाधानी ग्राहक संस्था कार्यातील सकारात्मकता अधिक वाढवत नेतो, याचा प्रत्यय पदोपदी येतो.

ग्राहकसेवेबरोबरच ग्राहकांच्या आर्थिक सेवेबाबतच्या संपूर्ण गरजा संस्थेच्या माध्यमातून पूर्ण करता येण्याची क्षमता संस्थेमध्ये विकसित करणे, त्यासाठी परत आर्थिक ताकद, ती आर्थिक ताकद पुरेशी असणे, वेगवेगळ्या योजनांच्या माध्यमातून ग्राहकांच्या गरजा ओळखून त्यानुरूप योजनांचे कार्यान्वयन करणे, अर्थ क्षेत्रातील स्थित्यंतरे लक्षात घेऊन आपल्या धोरणांमध्ये योग्य ते बदल घडवणे ही सजगता स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने सातत्याने दाखवली. त्याचबरोबर नवतंत्रज्ञानाचा संयत उपयोग करण्याचा प्रयत्नही संस्थेच्या ग्राहकसेवेची प्रत चांगली राखण्यासाठी उपयुक्त ठरला.

## प्रत्येक शाखा आर्थिक पायावर स्थिर करण्याला प्राधान्य

गेल्या ३४ वर्षांच्या प्रवासात शाखाविस्तार करतानाच संस्थेने प्रत्येक शाखा आर्थिक पायावर स्थिर करण्याला प्राधान्य दिले. त्यात चांगले यशही आले. संस्थेच्या सर्व १७ही शाखांच्या व्यवसायाचे अवलोकन केले, तर प्रत्येक शाखा स्वतंत्र संस्थेइतका व्यवसाय करताना दिसेल. शाखा स्थिर आणि स्थावर करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. मोठ्या प्रमाणावर इमारत निधी गठित करण्यात आला. त्यातून आठ शाखा स्वमालकीच्या उत्तम कार्यालयात सुस्थापित झाल्या. आता रत्नागिरी शहरातील आठवडा बाजार परिसरात संस्थेचे १२ हजार चौरस फुटांचे चार मजल्यांचे स्वमालकीचे कार्यालय उभे राहत आहे. सर्व सभासदांना अभिमान वाटावा, असा हा क्षण आहे. स्थावर मालमत्ता हा केवळ दिखावा किंवा फक्त सोय नसते, तर आर्थिक परिभाषेत याचे महत्त्व अधिक असते. संस्थेची नेटवर्थ वाढवण्यासाठी अशा गुंतवणुकीला वेगळे महत्त्व असते.

हा यशदायी प्रवास शक्य झाला, तो स्वामींच्या कृपेमुळे, पूजनीय दादा महाराजांच्या मार्गदर्शनामुळे, तसेच ग्राहक सभासदांनी ठेवलेला विश्वास, त्यातून दिलेली ऊर्जा, संचालक मंडळाने दिलेले सहकार्य आणि अधिकारी-कर्मचाऱ्यांनी दिलेल्या सेवा या सगळ्याच्या समुच्चयातून. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अर्थविश्व दररोज नवी ताकद निर्माण करून अधिक व्यापक होताना पाहताना मनस्वी आनंद होतो, कृतार्थतेचा भाव मनात तरळत राहतो.

**- ॲड. दीपक म. पटवर्धन**
अध्यक्ष, स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

- **रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३
- **मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४
- **कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९
- **कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११
- **पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४
- **जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९
- **खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९
- **मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८
- **पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०
- **लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३
- **राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३
- **नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८
- **साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४
- **देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०
- **चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

- **देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

- **कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

# पतसंस्थेच्या विविध कर्ज योजना

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ग्राहकांना विविध प्रकारच्या योजनांच्या माध्यमातून कर्जे उपलब्ध करून देते. त्या योजनांची माहिती येथे दिली आहे.**

## वैयक्तिक कर्ज

घरगुती अडचण, शुभकार्य, आजारपण यासाठी एक लाख २५ हजार रुपयांपर्यंतचे कर्ज ३६ ते ६० महिने मुदतीने उपलब्ध होते. दरमहा १० तारखेपर्यंत कर्जाचा हप्ता भरणे अनिवार्य. कर्जाची सुलभ प्रक्रिया पूर्ण करून कर्ज प्राप्त करता येऊ शकते.

**आवश्यक कागदपत्रे :**

१. कर्जदार + २ जामीनदार
२. उत्पन्न पुरावे - पगार दाखला/इन्कम टॅक्स रिटर्न
३. रेशनकार्ड/आधार कार्ड/लाइट बिल यांपैकी कोणतीही एक झेरॉक्स
४. पासपोर्ट साइझ फोटो
५. पॅनकार्ड झेरॉक्स
६. १०० रुपयांच्या बाँडपेपरवर प्रतिज्ञापत्र
७. कर्जरोखा - (प्रति लाख) १०० रुपयांचा बाँड पेपर (कर्जदाराच्या नावाने)
८. करारपत्र - १०० रुपयांचा बाँडपेपर (कर्जदाराच्या नावाने)

## वाहन कर्ज

वाहनतारण कर्ज दुचाकी, रिक्षा, कार वगैरे वाहन घेण्यासाठी अतिशय सुलभ प्रक्रिया करून प्राप्त करता येते. याची मुदत तीन, पाच किंवा सात वर्षे.

**आवश्यक कागदपत्रे**

१. कर्जदार + २ जामीनदार
२. उत्पन्न पुरावे - पगार दाखला/इन्कमटॅक्स रिटर्न
३. रेशनकार्ड/आधार कार्ड/लाइट बिल यांपैकी कोणतीही एक झेरॉक्स
४. पासपोर्ट साइझ फोटो
५. पॅनकार्ड झेरॉक्स
६. १०० रुपयांच्या बाँडपेपरवर प्रतिज्ञापत्र
७. कर्जरोखा - (प्रति लाख) १०० रुपयांचा बाँड पेपर (कर्जदाराच्या नावाने)
८. करारपत्र - १०० रुपयांचा बाँडपेपर (कर्जदाराच्या नावाने)
९. वरील कागदपत्रे + कोटेशन + ३० टक्के दुरावा रक्कम + बोजा फॉर्म

## व्यवसाय कर्ज

या योजनेअंतर्गत व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायासाठी खेळत्या भांडवलाच्या उपलब्धतेकरिता एक कोटी रुपयांपर्यंतचे कर्ज पाच ते १० वर्षांच्या मुदतीने उपलब्ध होऊ शकते.

**आवश्यक कागदपत्रे**

१. कर्जदार + २ जामीनदार
२. उत्पन्न पुरावे - पगार दाखला/इन्कम टॅक्स रिटर्न
३. रेशनकार्ड/आधार कार्ड/लाइट बिल यांपैकी कोणतीही एक झेरॉक्स
४. पासपोर्ट साइझ फोटो
५. पॅनकार्ड झेरॉक्स
६. १०० रुपयांच्या बाँडपेपरवर प्रतिज्ञापत्र
७. कर्जरोखा - (प्रति लाख) १०० रुपयांचा बाँड पेपर (कर्जदाराच्या नावाने)
८. करारपत्र - १०० रुपयांचा बाँडपेपर (कर्जदाराच्या नावाने)
९. स्थावर मालमत्ता तारण
१०. सर्च रिपोर्ट
११. रजिस्टर मॉर्गेज
१२. व्हॅल्युएशन रिपोर्ट

## गृहबांधणी/फ्लॅट खरेदी कर्ज

नवीन फ्लॅटची खरेदी किंवा घरबांधणीकरिता १५ वर्षांच्या मुदतीने आकर्षक व्याजदरात कर्ज उपलब्ध.

### आवश्यक कागदपत्रे

१. कर्जदार + २ जामीनदार
२. उत्पन्न पुरावे - पगार दाखला/इन्कम टॅक्स रिटर्न
३. रेशनकार्ड/आधार कार्ड/लाइट बिल यांपैकी कोणतीही एक झेरॉक्स
४. पासपोर्ट साइझ फोटो
५. पॅनकार्ड झेरॉक्स
६. १०० रुपयांच्या बॉंडपेपरवर प्रतिज्ञापत्र
७. कर्जरोखा - (प्रति लाख) १०० रुपयांचा बॉंड पेपर (कर्जदाराच्या नावाने)
८. करारपत्र - १०० रुपयांचा बॉंडपेपर (कर्जदाराच्या नावाने)
९. स्थावर मालमत्ता तारण
१०. सर्च रिपोर्ट
११. रजिस्टर मॉर्गेज
१२. व्हॅल्युएशन रिपोर्ट

## सोनेतारण कर्ज

सोनेतारण कर्ज ही संस्थेची सर्वांत लोकप्रिय कर्ज योजना असून, संस्था हे कर्ज केवळ २० मिनिटांत उपलब्ध करून देते. सोन्याच्या (नेट वेट) वजनावर आधारित मूल्यांकन करून मूल्यांकित रकमेएवढे कर्ज एक महिना ते एक वर्ष मुदतीने उपलब्ध होते. याची प्रक्रिया अत्यंत सुलभ असून, व्याजदर किफायतशीर असतात.

## पिग्मी/मुदत ठेव कर्ज

केवळ एक अर्ज भरून जमा ठेव रकमेच्या ८५ टक्क्यांपर्यंत कर्ज उपलब्ध होते. पिग्मी कर्जासाठी व्याजदर केवळ आठ टक्के आहे. मुदत ठेव तारण कर्ज ठेवीच्या व्याजदरापेक्षा एक टक्का जास्त.

# कर्ज योजनांचे व्याजदर समानीकृत हप्ता (EMI Method)

| कर्जप्रकार | कर्जमर्यादा | व्याजदर |
|---|---|---|
| गृहबांधणी/फ्लॅटखरेदी/गृहखरेदी | १५ वर्षे | ९.५०% |
| वाहनखरेदी (कार लोन इ.) | ५ ते ७ वर्षे | ९.७५% |
| वाहनखरेदी (दुचाकी) | ५ ते ७ वर्षे | १२.००% |
| व्यवसाय कर्ज | रु. २५ लाखांपर्यंत | १२% |
| व्यवसाय कर्ज | रु. २५ लाख ते रु. ९९,९९,९९९ पर्यंत | ११.५०% |
| वैयक्तिक कर्ज | रु. १.२५ लाखांपर्यंत | १४.००% |
| सोनेतारण | रु. १ लाखापर्यंत | १३% |
| सोनेतारण | रु. १ लाख ते ३ लाखांपर्यंत | १२.५०% |
| सोनेतारण | रु. ३ लाख ते ५ लाखांपर्यंत | १२% |
| सोनेतारण | रु. ५ लाख व अधिक | ११% |
| व्यवसाय कर्ज | रु. १ कोटी | ११.००% |

***महत्त्वाची सूचना :*** *कोणत्याही प्रकारच्या कर्जासाठी कर्ज प्रकरणानुरूप अतिरिक्त अटी-शर्ती लागू होऊ शकतात किंवा अधिक कागदपत्रे लागू शकतात.*

## स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेची वैशिष्ट्ये

- सीबीएस संगणक प्रणालीचा वापर.
- पदवीधर आणि प्रशिक्षित कर्मचारीवर्ग कार्यरत.
- पिग्मीच्या संकलनासाठी ॲपचा वापर.
- संस्थेची स्वतःची वेबसाइट आहे. https://swaroopanandpatsanstha.com/
- आरटीजीएस/एनईएफटी सेवा उपलब्ध.
- संचालक मंडळाची निवड स्थापनेपासून बिनविरोध.
- स्वमालकीच्या नऊ जागा.

## सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आपल्या शिस्तबद्धतेमुळे अर्थकारणात यशस्वी आहेच; मात्र संस्थेने सामाजिक भानही कायम जपले आहे. विविध सामाजिक उपक्रमांमध्ये संस्थेने वेळोवेळी सहभाग घेतला असून, आवश्यकतेनुसार मदत आणि देणग्याही दिल्या आहेत. कोरोनाच्या महाभयंकर साथीच्या काळात कर्जदारांना मदतीसाठी नफ्यातून ७५ लाख रुपयांची तरतूद करणारी ही महाराष्ट्रातील एकमेव पतसंस्था आहे. विद्यार्थ्यांना पाठ्यवृत्ती देण्याबरोबरच संस्थेने सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांना पुरस्कार देऊन गौरवले आहे. पतसंस्थेने विविध ग्रामपंचायती, जिल्हा शासकीय रुग्णालय, विविध शैक्षणिक संस्था आणि शाळा, मतिमंद मुलांच्या संस्था, भाषा आणि सांस्कृतिक क्षेत्रातील संस्था, देवस्थाने, कापडी पिशवी जनजागृती अभियान, वाचनालये, सामाजिक संस्था आदींना भरघोस आर्थिक मदत/देणग्या वेळोवेळी दिल्या आहेत. त्यामुळे समाजाच्या केवळ आर्थिक उन्नतीसाठीच नव्हे, तर विविधांगी प्रगतीमध्ये संस्था हातभार लावत आहे.




## पतसंस्थेला मिळालेले विविध पुरस्कार


- २०१२ साली महाराष्ट्र शासनाचा सहकार भूषण पुरस्कार
- २०२३ साली राष्ट्रीय सहकार विकास निगमचा गुणवत्ता पुरस्कार
- महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंथा फेडरेशनचा दीपस्तंभ पुरस्कार सलग सात वर्षे
- बँको पुरस्कार सलग नऊ वर्षे



**ग्राहकांच्या लेखणीतून**

## ठेववृद्धी मासाची आम्ही वाट पाहतो...!

स्वरूपानंद पतसंस्थेबद्दल खूप विश्वास वाटतो. ही संस्था आपली वाटते. इथे चांगली सेवा मिळते. त्यामुळे या संस्थेत पुन्हा पुन्हा यावेसे वाटते. संस्थेच्या ठेव योजना अवास्तव आणि धोकादायक नसतात. इथे ठेवींवरचे व्याजदर अन्य बँकांच्या व्याजदरांच्या तुलनेत जास्त असतात; मात्र ते अतिरिक्त चढे नसतात. त्यामुळे ठेव ठेवताना सुरक्षितता जाणवते. संस्थेची आर्थिक माहिती सातत्याने प्रसिद्ध होत असते. त्यावरूनही संस्थेची प्रगती सहज ध्यानात येते. मी गेली अनेक वर्षे या पतसंस्थेत ठेव गुंतवणूक करत असून, मला आकर्षक परतावा आणि तोही वेळेवर मिळतो आहे. संस्थेशी एक भावनिक नातेही निर्माण झाले आहे.



या संस्थेचे नेतृत्व करणारे ॲड. दीपक पटवर्धन यांचे आचरण स्वच्छ, स्पष्ट आहे. अत्यंत शिस्त आणि कमालीची विश्वासार्हता त्यांनी जपली आहे. त्यामुळे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेबद्दल कमालीचा विश्वास वाटतो. म्हणून स्वरूपानंद पतसंस्था आणि स्वामींचे नाव असलेल्या ठेव योजनांमध्ये मी आणि माझे कुटुंबीय सातत्याने गुंतवणूक करत असतो.

प्रतिवर्षी आम्ही ठेववृद्धी मासाची वाट पाहतो आणि वार्षिक नैमित्तिक कर्माचरण या पद्धतीने ठेव गुंतवतो. यावर्षीही आम्ही ठेव गुंतवण्यासाठी आतुर आहोत. पतसंस्थेच्या प्रगतीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

**- अशोक चंदर शेट्ये,**
परशुराम नगर, शिवाजीनगर, रत्नागिरी

# स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी
## महत्त्वाच्या क्षणांची चित्रमय झलक




सहकार तपस्या पुरस्कार रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीशजी मराठे यांना प्रदान




राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा दीपस्तंभ पुरस्कार ना. उदय सामंत यांच्या हस्ते स्वीकारताना. सोबत राज्य फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे व अन्य अधिकारी



सहकार निवडणूक आयुक्त श्री.अनिल कवडे यांचे संस्थेत स्वागत करताना




राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा सहकार भूषण पुरस्कार तत्कालीन राज्यपाल के. शंकरनारायणन् , मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते स्वीकारताना



सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी यांना संस्थेत सन्मानित करताना




स्वरूपानंद पतसंस्था प्रधान कार्यालयाचे भूमिपूजन उद्योग मंत्री उदय सामंत आणि रा. स्व. संघाचे दत्ताजी सोलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

# ठेव वृध्दी मास

## 20 जून ते 20 जुलै 2025

- स्वरूपांजली ठेव
12 ते 18 महिने

8.50 %
(सर्वसाधारण)

9%
(ज्येष्ठ नागरिक/महिला)

- सोहम ठेव योजना
19 ते 36 महिने
मासिक व्याज

8.25 %
(सर्वसाधारण)

8.50 %
(ज्येष्ठ नागरिक/महिला)



आमच्या विश्वासार्ह व आकर्षक ठेवयोजनांमध्ये गुंतवणूक करुन निश्चिंत व्हा !

ॲड. दीपक पटवर्धन (अध्यक्ष)

# स्वामी स्वरूपानंद सह.पतसंस्था

मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य

प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.

मो. नं. 9403 506 363 www.swaroopanandpatsanstha.com